**नियमित दिवाणी दावा क्रमांक ४७०/२०१७**
(सीएनआर क्र.एमएचएएच०८-०००६९५-२०१७)

**निशाणी क्रमांक ५१ वरील आदेश**

वादीने सदरचा अर्ज दावा दुरूस्तीस परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. वादीचे अर्जातील कथन थोडक्यात असे :- त्याने सदरचा दावा, प्रतिवादी क्र. १ ते ४ व १४, १५ यांच्याविरुध्द जाहीर ठराव होवून मिळण्यासाठी व निरंतरीचा मनाई आदेश मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. वादीचे वय झाल्याने त्याला न्यायालयात हजर राहणे शक्य होत नाही त्यामुळे त्याचा मुलगा कैलास संपत आहेर यास वादी क्र.२ म्हणून अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती होणे गरजेचे आहे.

०३. सदर दाव्यात वादीने न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करुन मोजणी करण्यात यावी असा अर्ज नि.०८ वर दिलेला होता व तो न्यायालयाने मंजुर केलेला आहे. तालुका निरीक्षक भुमि अभिलेख, संगमनेर यांनी मो.र.क्र.४८५६/२०१९ अन्वये मोजणी करून मोजणीचा नकाशा अहवाल नि.४३ न्यायालयात दाखल केलेला आहे. सदर मोजणी नकाशाप्रमाणे 'वादीचे दावा क्र.१३अ ही मिळकत पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र.५० चे रुंदीकरणासाठी संपादित होत नाही' असा अहवाल कमिशनर यांनी हिरव्या रंगात दाखविला आहे. त्या अनुषंगाने अर्ज नि. ५१ मध्ये नमुद केलेप्रमाणे दुरुस्ती दाव्याकामी करणे गरजेचे झाले आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. वादीचा दावा दुरूस्तीचा अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. उलट वादी व प्रतिवादींना न्याय मिळणार आहे. सबब अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

०४. वादीचे सदर अर्जास प्रतिवादींनी नि.५३ कडे म्हणणे दाखल करून सक्त हरकत नोंदवली आहे. प्रतिवादी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन करतात की, सदरचा अर्ज त्यांना मान्य व कबुल नाही. दाव्यात मुददे निश्चीत झाले असून दावा आता चौकशीला लागला आहे अशा परिस्थितीमध्ये दाव्याकामी दुरुस्ती करता येणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार आहे. वादीला पुरेशी संधी असतानाही त्याने दावा करतेवेळी दुरुस्तीची मागणी केलेली नाही सबब अर्ज नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०५. अर्ज व म्हणणे वाचले व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्याने सदरचा दावा, प्रतिवादी क्र. १ ते ४ व १४, १५ यांच्याविरुध्द जाहीर ठराव होवून मिळण्यासाठी व निरंतरीचा मनाई आदेश मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे, तो वृध्द झाल्याने त्याला न्यायालयात हजर राहणे शक्य होत नाही त्यामुळे त्याचा मुलगा कैलास संपत आहेर यास वादी क्र.२ म्हणून अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती होणे गरजेचे आहे. तसेच सदर दाव्यात वादीने न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करुन मोजणी करण्यात यावी असा अर्ज नि.०८ वर दिलेला होता व तो न्यायालयाने मंजुर केलेला आहे. तालुका निरीक्षक भुमि अभिलेख, संगमनेर यांनी मो.र.क्र. ४८५६/२०१९ अन्वये मोजणी करून मोजणीचा नकाशा अहवाल नि.४३ न्यायालयात दाखल केलेला आहे. सदर मोजणी नकाशाप्रमाणे ‘वादीचे दावा क्र.१अ ही मिळकत पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र.५० चे रुंदीकरणासाठी संपादित होत नाही’ असा अहवाल कमिशनर यांनी हिरव्या रंगात दाखविला आहे. त्या अनुषंगाने अर्ज नि. ५१ मध्ये नमुद केलेप्रमाणे दुरुस्ती दाव्याकामी करणे गरजेचे झाले आहे.

०६. वादीने मागितलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. सदरची घटना ही दावा दाखल झाल्यानंतर घडलेली आहे त्यामुळे ती अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सदर दुरुस्तीमुळे दोन्ही पक्षकारांमधील वादाचे समुळ उच्चाटन करण्यास मदत होणार आहे त्यामुळे ती अभिलेखावर येणे गरजेचे आहे. तसेच या कामी पुन्हा पुन्हा दावे उद्‌भवु नयेत या कारणास्तव वादीचा अर्ज त्यांच्यावर खर्च लादुन मंजुर करणे योग्य होईल असे मला वाटते. सबब, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे, त्याबाबतचा सविस्तर आदेश मी खालील प्रमाणे पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. सदरचा अर्ज रक्कम रुपये १,५००/- खर्च लादून मंजुर करण्यात येतो. सदर खर्चाची रक्कम प्रतिवादींना देण्यात यावी.

२. वादीने सदरची दुरूस्ती सदरचा आदेश पारीत झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत करावी.

BABAR SANGITA PUNDLIK

Digitally signed by BABAR SANGITA PUNDLIK
Date: 2024.12.17 17:45:30 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- १७.१२.२०२४.

(श्रीमती. एस. पी. बाबर)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.